निर्भीड आणि सडेतोड
सरकारनामा

# Praja Foundation Report : भाजपची कामगिरी घसरली..; शिंदे, ठाकरे गटातील आमदारांचे प्रगती पुस्तक हाती

*Maharashtra Legislative Session : ठाकरे गटातील आमदारांनी आपली कामगिरी उंचावण्याचा प्रयत्न केला आहे.*



**Praja Foundation Report :** मुंबईतील विद्यमान आमदारांनी त्यांच्या दोन वर्षातील संविधानात्मक आणि वैधानिक कर्तव्यांची पूर्तता कशी केली, यांचे मूल्यमापन प्रजा फाऊंडेशनने प्रगती पुस्तकातून केले आहे. 'मुंबईतील आमदारांचे प्रगती पुस्तक 2023' नुकतेच प्रकाशित केले आहे. अधिवेशन कालावधीत आमदारांच्या कामगिरीबाबतचा हा अहवाल आहे. (praja foundation report maharashtra legislative session)

या अहवालात भाजपच्या आमदारांची कामगिरी घसरली असल्याचे आकडेवारीवरुन स्पष्ट झाले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटाचे काही आमदार पिछाडीवर पडले आहेत तर ठाकरे गटातील आमदारांनी आपली कामगिरी उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. काय आहे हा अहवाल जाणून घेऊया.

### आशिष शेलार पिछाडीवर

भाजपचे नेते, मुंबई भाजपचे अध्यक्ष आशिष शेलार हे गेल्यावर्षीपेक्षा यंदा पिछाडीवर पडलेले दिसतात. शेलार हे सातव्या क्रमांकावर होते. मात्र यंदा ते नवव्या क्रमांकावर आहेत. आमदार अमित साटम यांनी आपला ४ था क्रमांक अबाधित ठेवला आहे. आमदार भारती लव्हेकर यांनी काहिशी चांगली कामगिरी करीत १३ व्या क्रमांकावरून ६ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. पराग शाह यांनीही १४ व्या

क्रमांकावरून थेट ५ व्या क्रमांकावर उडी घेतली आहे. आमदार मिहीर कोटेचा यांनीही १५ व्या क्रमांकावरून थेट ११ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. योगेश सागर हे १० व्या क्रमांकावरून १४ व्या क्रमांकावर घसरले आहेत. योगेश सागर हे १० व्या क्रमांकावरून १४ व्या क्रमांकावर घसरले आहेत.

कालिदास कोळंबकर हे १२ व्या क्रमांकावरून २० व्या क्रमांकावर आले आहेत. पराग आळवणी हे दुसऱ्या क्रमांकावरून सातव्या क्रमांकावर घसरले आहेत. भाजपचे आमदार तमिळ सेलवन हे गतवर्षी ११ व्या क्रमांकावर होते ते एकने घसरून १२ क्रमांकावर घसरले आहेत.अतुल भातखळकर हे पाचव्या क्रमांकावर होते ते थेट १७ व्या क्रमांकावर फेकले गेले आहेत.

**शिंदे गटातील आमदारांचे स्थान..**

- आमदार सदा सरवणकर हे २१ व्या क्रमांकावरून २८ व्या क्रमांकावर घसरले आहेत.
- आमदार मंगेश कुडाळकर ९ व्या क्रमांकावरून १३ व्या क्रमांकावर घसरले आहेत.
- दिलीप लांडे यांची कामगिरी २३ व्या क्रमांकावरून २७ व्या क्रमांकवर घसरली आहे.
- आमदार प्रकाश सुर्वे ३० व्या क्रमांकावरून थेट २५ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

**अशी आहे ठाकरे गटाची आमदारांची कामगिरी**

- संजय पोतनीस यांनी प्रगती करीत २२ व्या क्रमांकावरून २१ क्रमांकावर झेप घेतली आहे.
- अजय चौधरी यांनी, २४ व्या क्रमांकावरून थेट १९ व्या क्रमांकावर झेप घेत आहे.
- सुनील राऊत यांची २० व्या क्रमांकावरून २९ व्या क्रमांकावर घसरण झाली आहे.
- आमदार सुनील प्रभू यांनी तिसऱ्या क्रमांकावरून दुसऱ्या क्रमांकावर भरारी घेतली आहे.
- रवींद्र वायकर यांनी, ३१ व्या क्रमांकावरून थेट २२ व्या क्रमांकावर आहेत.
- रमेश कोरगावकर यांनी २६ व्या क्रमांकावरून २४ व्या क्रमांकावर भरारी घेतली आहे.

**(Edited By : Mangesh Mahale)**

Link**:** भाजपची कामगिरी घसरली.. ; शिंदे, ठाकरे गटातील आमदारांचे प्रगतीपुस्तक हाती praja foundation report maharashtra legislative session bjp eknath shinde | Sarkarnama